
22 NOV FRONT PAGE_Layout 1 11/22/2025 6:38 PM Page 1


सायंदैनिक

# गुड इव्हिनिंग City



goodeveningcity@gmail.com

२२ नोव्हेंबर २०२५, शनिवार | वर्ष १४ वे | अंक १९३ | पृष्ठे ६


# प्रथमच सरन्यायाधीशांच्या शपथविधी सोहळ्याला ७ देशांचे चीफ जस्टिस



**नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर (वृत्तसंस्था) :** न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी देशाचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. राष्ट्रपती भवनात होणाऱ्या या शपथविधी समारंभात ब्राझीलसह सात देशांचे मुख्य न्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उपस्थित राहतील. वृत्तानुसार, भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या सरन्यायाधीशाच्या शपथविधी सोहळ्याला इतर देशांतील इतक्या मोठ्या संख्येने न्यायिक शिष्टमंडळ उपस्थित राहणार आहे. या समारंभाला भूतान, केनिया, मलेशिया, मॉरिशस, नेपाळ आणि श्रीलंकेचे मुख्य न्यायाधीश त्यांच्या कुटुंबीयांसह उपस्थित राहतील.

सध्याचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती गवई यांचा कार्यकाळ २३ नोव्हेंबर रोजी संपत आहे. पुढील सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत ९ फेब्रुवारी २०२७ रोजी निवृत्त होतील. त्यांचा कार्यकाळ अंदाजे १४ महिन्यांचा असेल. राष्ट्रपती भवनात होणाऱ्या सरन्यायाधीशांच्या शपथविधी समारंभाची निमंत्रणे तयार करण्यात आली आहेत. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे संपूर्ण कुटुंब हिसारमधील पेटवाड गावात राहते. त्यांचे मोठे भाऊ मास्टर ऋषिकांत हे त्यांच्या कुटुंबासह गावात राहतात, तर एक भाऊ हिसार शहरात राहतो आणि तिसरा भाऊ दिल्लीत राहतो. सूर्यकांत यांच्या व्यतिरिक्त, त्यांचे तीन भाऊ – ऋषिकांत, शिवकांत आणि देवकांत – यांनाही या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. मोठे भाऊ मास्टर ऋषिकांत म्हणाले की, संपूर्ण कुटुंब एक दिवस आधी दिल्लीला रवाना होईल आणि हरियाणा भवनमध्ये राहतील.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी अनेक घटनात्मक खंडपीठांवर काम केले आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी घटनात्मक, मानवी हक्क आणि प्रशासकीय कायद्याच्या बाबींचा समावेश असलेले १,००० हून अधिक निर्णय दिले. त्यांच्या ऐतिहासिक निर्णयांमध्ये २०२३ मध्ये कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवण्याचा निर्णय समाविष्ट आहे. २०१७ मध्ये बलात्कार प्रकरणात डेरा प्रमुख गुरमीत राम रहीम यांच्याशी संबंधित तुरुंगात झालेल्या हिंसाचारानंतर पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने डेरा सच्चा सौदाची संपूर्ण स्वच्छता करण्याचे आदेश दिले होते. न्यायमूर्ती सूर्यकांत हे त्या खंडपीठाचा भाग होते ज्यांनी वसाहतकालीन देशद्रोह कायदा स्थगित केला होता आणि सरकार त्याचा आढावा घेईपर्यंत त्याअंतर्गत कोणतेही नवीन एफआयआर नोंदवू नयेत असे निर्देश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनसह सर्व बार असोसिएशनमधील एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्याचे श्रेयदेखील न्यायमूर्ती सूर्यकांत यांना जाते. १९६७च्या अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या निर्णयाला रद्दबातल ठरवणाऱ्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठात न्यायमूर्ती सूर्यकांत हे होते, ज्यामुळे विद्यापीठाला संस्थेच्या अल्पसंख्याक दर्जाचा पुनर्विचार करण्याचा मार्ग मोकळा झाला. बेकायदेशीर पाळत ठेवण्याच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सायबर तज्ञांचे एक पॅनेल स्थापन करणाऱ्या पेगासस स्पायवेअर प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या खंडपीठाचा ते भाग होते.


योजनेमध्ये मोफत उपचार व शस्त्रक्रिया

बुलडाणा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल

क्रिटीकल केअर व ट्रॉमा सेंटर

पत्ता :– आरास ले आऊट, जांभरूण रोड, बुलडाणा (२४ तास सेवा उपलब्ध)
मो. 7575919191, 7575929292,7575939393, 9730650014

(MJPJAY) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, (PMJAY) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना संलग्नित

संपुर्ण गटातील कुटूंबासाठी संपूर्ण प्रकाराच्या आजारांवरती मोफत व गुणवत्तापुर्ण उपचार व शस्त्रक्रिया इ.

खालील आजारावरील सुविधा संपूर्ण मोफत

१) नवजात बाळाचे आजार (NICU)
२) लहान मुलांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (PICU)
३) मोठ्या मानसांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (मेडिसिन ICU)
४) श्वासाचे आजार / मेंदुचे आजार व शस्त्रक्रिया.
५) किडनिचे आजार व मुतखड्याची शस्त्रक्रिया.
६) पोटाचे आजार व शस्त्रक्रिया तसेच दुर्बिनद्वारे शस्त्रक्रिया (Laproscopy)
७) अस्थिरोग विभाग व शस्त्रक्रिया
८) जळीत रूग्णांचे आजार व शस्त्रक्रीया. (Burn Unit)
९) ट्रॉमा व एक्सीडेंट सर्जरी व उपचार
१०) स्त्रिरोग व प्रसुतीरोग उपचार व शस्त्रक्रिया.
११) कान, नाक, घसा उपचार व शस्त्रक्रीया.
१२) दंतरोगाची सर्जरी व उपचार
१३) प्लास्टीक सर्जरी उपचार
१४) कॅन्सर उपचार, शस्त्रक्रिया व किमोथेरपी इत्यादीची सुविधा

योजनेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे :- १) ओरिजनल राशनकार्ड किंवा २) कुटूंबातील सर्वांचे ओरिजनल आधार्ड कार्ड. ३) आयुष्यमान कार्ड

टिप :- इमर्जसिंमध्ये फक्त रूग्णांच्या आधार कार्डच्या झेरॉक्स वरती सुध्दा रूग्णाला उपचार दिला जाईल.


# अपघातात धाराशिवमध्ये पाच जणांचा जागीच मृत्यू

**धाराशिव, २२ नोव्हेंबर (वृत्तसंस्था) :** सोलापूर हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर धाराशिव येथे शनिवारी भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर काहीजण जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी सकाळी ही क्रुझर गाडी सोलापूर-हैदराबाद महामार्गावरुन जात होती. या गाडीतील प्रवासी सोलापूरवरुन नळदुर्ग येथे देवदर्शनासाठी निघाले होते. त्यावेळी धाराशिवमधील अणदूर परिसरात त्यांच्या जीपचे टायर्स अचानक फुटले. त्यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि ही जीप एका ट्रॅक्टरला धडकून रस्त्यावर पलटी झाली. अपघात झाल्यानंतर आजुबाजूचे नागरिक तातडीने मदतीसाठी धावले. काही नागरिकांनी जोर लावून क्रुझर गाडी सरळ करुन त्यामधून मृतदेह बाहेर काढले. आतापर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार, या अपघातामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये तीन महिलांचा समावेश आहे. या अपघातामध्ये सात ते आठजण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे अपघातामधील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जखमींना उपचारासाठी सोलापूर येथे हलवले आहे.

या अपघातामध्ये मृत झालेले आणि जखमी झालेले सर्व प्रवासी दक्षिण उळे सोलापूर येथील असल्याचे समजते. या गाडीचे टायर्स फुटल्याने ही गाडी अनियंत्रित होऊन एका ट्रॅक्टरला धडकली. ही धडक इतकी जोरदार होती की, गाडीच्या एका भागाचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे. या जबर धडकेमुळे गाडीत बसलेल्या पाच जणांचा जागीच मृत्यू झाला.

# शाळेत दारू पिल्याप्रकरणी मुख्याध्यापकाचे निलंबन; सीईओ गुलाबराव खरात यांची कारवाई

**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्हा परिषद शाळेतच दारू पिलेल्या मुख्याध्यापकास निलंबीत करण्यात आले आहे. जिल्हा परिषद मोहना बु. शाळेचा प्रभारी मुख्याध्यापक धम्मसागर साहेबराव कांबळे व चक्क कागदावरच खिचडी वाटणारा बावनबीर येथील मुख्याध्यापक नरहरी टिकार यांना सीईओंनी निलंबित केले आहे. एकाच दिवशी दोन मुख्यापकावर निलंबनाची कारवाई झाल्याने शिक्षण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. दरम्यान, अशा शिक्षकांवर कठोर कारवाई करण्याचा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी दिला आहे. शाळेवरील मुख्याध्यापकाची सप्टेंबर २०२५ मध्ये बदली झाल्याने प्रभारी मुख्याध्यापक म्हणून धम्मसागर साहेबराव कांबळे (वय ४५) हा शिक्षक कार्यभार सांभाळत होता. विशेष म्हणजे हा शिक्षक मागील दोन वर्षांपासून शाळेमध्येच एका वर्गखोलीत वास्तव्याला होता. दररोज शाळेतच राहणे आणि तेथेच शिकविण्याचे काम करीत होता. याशिवाय तेथेच अधूनमधून दारूजी डोसत होता. २० नोव्हेंबरला त्याने तर कहरच केला, दारू पिऊन तो झिंगाट झाला. शाळेच्या आवारातच धिंगाणा घालायला सुरुवात केली. सोबतच त्याने विद्यार्थ्यांसोबत असभ्य वर्तणूक केली. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. यापुढे जर कुणी आशाप्रकारचे कृत्य केल्यास त्यांच्या फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी माध्यमांशी बोलातांना सांगितले.

# मध्यप्रदेशात थंडीमुळे २ जणांचा मृत्यू

**धाराशिव, २२ नोव्हेंबर (वृत्तसंस्था) :** उत्तर भारतातील डोंगराळ राज्यांमध्ये झालेल्या बर्फवृष्टीमुळे मैदानी भागात थंडी वाढली आहे. मध्य प्रदेशात गेल्या दोन दिवसांत थंडीमुळे दोघांचा मृत्यू झाला. शुक्रवारी भोपाळ आणि इंदूरसह सात जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट आली. पचमढीमध्ये पहिल्यांदाच तापमान ५.८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. नर्मदापुरममध्ये दृश्यमानता ५०० मीटरपर्यंत नोंदवण्यात आली. हिवाळ्यात, वायव्येकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे राजस्थानमध्ये धुके निर्माण होऊ लागले आहे. यामुळे दिवसाचा सूर्यप्रकाश इतर दिवसांच्या तुलनेत कमी झाला आहे. रात्रीचे किमान तापमान देखील १ अंशाने वाढले आहे, जे अनेक शहरांमध्ये एक ते दोन अंकी तापमानापर्यंत पोहोचले आहे. पुढील दोन आठवडे तापमान कमी होणार नाही.










बातम्या तसेच जाहीरातीसाठी संपर्क | प्रकाशक : रणजीतसिंग राजपूत ९८५०३७७३४४ | संपादक : ॲड. हरीदास उंबरकर ९७६३४६९१८४ // गुड इव्हिनिंग सिटी सोशल मिडीयावर सुद्धा... किंमत १ रू.

22 NOV LAST PAGE_Layout 1 11/22/2025 6:38 PM Page 1



# धामणगाव बढे येथे टिपू सुलतान जयंती उत्साहात



**धामणगाव बढे, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही धामणगाव बढे येथे शेर-ए-हिंद हजरत टिपू सुलतान यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि धूमधामात साजरी करण्यात आली. टिपू सुलतान चौकात एक भव्य मंडप उभारण्यात आला होता, जिथे आयोजित कार्यक्रमात मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. चौकात स्थापित असलेल्या हजरत टिपू सुलतान यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली आणि त्यांच्या शौर्याचे स्मरण करण्यात आले. यावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. धामणगाव बढे पोलीस स्टेशनचे ठाणेदार नागेश जायले यांनी स्वतः संपूर्ण परिसरामध्ये कडक निगराणी ठेवली, ज्यामुळे हा समारंभ शांततापूर्ण वातावरणात पार पडेल याची खात्री करण्यात आली. पोलिसांच्या तत्परतेमुळे, हा सोहळा यशस्वीरित्या आणि सलोख्याने साजरा झाला.

यावेळी टिपू सुलतान जयंतीत मुस्लिम बांधवानी उत्साहात सहभाग घेतला यामध्ये लहान मुलांपासून तर मोठ्यांनी आनंदात टिपू सुलतान जयंती साजरी केली आहे. यामुळे पोलिस प्रशासनाकडून त्यांचे कौतुक करण्यात आले.

टिपू सुलतान जयंतीच्या निमित्ताने, वक्त्यांनी त्यांची वीरता, प्रशासकीय क्षमता आणि स्वातंत्र्य संग्रामातील त्यांचे योगदान याबद्दल माहिती दिली. यावेळी गावातील मुस्लिम समुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता

# कडाक्याच्या थंडीचा पिकांना होणार फायदा; गहू, हरभरा, ज्वारीसाठी पोषक वातावरण



**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** गेल्या काही दिवसांपासून वाढत असलेल्या थंडीच्या लाटेमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाची भावना पाहायला मिळत आहे. तापमानात झालेली घट अनेक हंगामी पिकांसाठी अनुकूल ठरत असून नैसर्गिकरित्या किडींचा प्रादुर्भावही कमी होत आहे. कृषी तज्ज्ञाच्या म्हणण्यानुसार, गहू, हरभरा, ज्वारी, मका यांसारख्या रब्बी हंगामातील पिकांना थंड हवामान मोठा फायदा देते. दिवस-रात्र तापमानातील फरक योग्य प्रमाणात राहिल्यास वनस्पतींची वाढ अधिक निरोगी होते. किडी व रोगराईचे प्रमाण घटल्याने उत्पादनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. काही फळपिकांसाठीही थंडीमुळे फुलधारणा व फळधारणा वाढण्यास साहाय्य होते. कृषी विभागाने शेतकऱ्यांना सल्ला दिला आहे की थंडीचा प्रभाव लक्षात घेऊन सिंचनाचे नियोजन करावे आणि पिकांना दवामुळे हानी होऊ नये म्हणून आवश्यक ती काळजी घ्यावी. थंडीची ही अनुकूलता कायम राहिल्यास या हंगामात उत्पादनात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या वातावरणात सातत्याने बदल होत आहे. या बदलत्या वातावरणाचा शेती पिकांवर परिणाम होत असल्याचं चित्र दिसत आहे. गेल्या आठवडाभरात असलेल्या ढगाळ वातावरणामुळे गव्हाच्या पिकावर मावा थिप्स यासारख्या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळं गव्हाचे पीक धोक्यात आले होते. मात्र त्यानंतर वातावरण निरभ्र झाल्यानंतर थंडीचा कडाका कायम राहिला असल्याने गव्हाच्या पिकांसाठी पोषक वातावरण निर्माण झालं आहे. बुलढाणा जिल्ह्यात सर्वत्र गव्हाची शेती बहरली आहे. जिल्ह्यातील शेतकरी ढगाळ वातावरणाच्या संकटातून सावरला आहे. जिल्ह्यात सर्वत्र गव्हाची शेती बहरली आहे. त्यामुळं यावर्षी गव्हाचं विक्रमी उत्पादन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच रब्बी हंगामातील गव्हाच्या पिकातून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फायदा होईल.

# धा.बढेत ५२ वर्षानंतर जुन्या आठवणींना उजाळा!



**धा.बढे, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** सध्याच्या धकाधकीच्या जीवनात 'गेट-टू-गेदर' (स्नेहसंमेलन) हा उपक्रम तरुण पिढीमध्ये लोकप्रिय होत असतानाच, धामणगाव बढे येथील १९७२-७३ च्या दहावीच्या बॅचने तब्बल ५२ वर्षांनी एकत्र येऊन एक नवा आदर्श घालून दिला आहे. वयाची सत्तरी ओलांडलेल्या या मित्र-मैत्रिणींनी पुन्हा एकदा एकत्र येत जुन्या शालेय आठवणींना भावनिक उजाळा दिला आणि एक कौतुकास्पद सोहळा संपन्न केला.आजकालची पिढी गेट-टू-गेदरच्या माध्यमातून जुन्या दिवसांच्या आठवणी ताज्या करत असते. परंतु, धामणगाव बढे येथील या वर्गमित्रांनी ५२ वर्षांचा मोठा कालावधी पार करून पुन्हा एकत्र येणे, ही बाब खरोखरच प्रेरणादायक आहे. ५२ वर्षांनंतरचा अनोखा मिलाफ १९७२-७३ मध्ये दहावीचा वर्ग एकत्र शिकून, त्यानंतर आपापल्या कुटुंबासोबत सुखी संसार करून, समाजात यशस्वी जीवन जगल्यानंतर हे सर्व वर्गमित्र-मैत्रिणी मोठ्या उत्साहाने पुन्हा भेटले. अर्धशतकाहून अधिक काळानंतर एकमेकांना भेटल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि जुन्या मित्रांना भेटण्याची उत्कंठा स्पष्टपणे दिसून येत होती. गप्पांच्या ओघात त्यांच्या बालपणीच्या आणि शालेय जीवनातील गोड आठवणी पुन्हा जिवंत झाल्या. विशेष सहकार्य या भावपूर्ण आणि यशस्वी कार्यक्रमासाठी नामदेव टेलर यांनी विशेष सहकार्य केले.

या वयातील मित्रांचे हे 'गेट-टू-गेदर' तरुण पिढीसाठी एक सुंदर संदेश आहे, की वेळेत जुन्या संबंधांना महत्त्व देणे आणि एकत्र येऊन आयुष्याचा आनंद लुटणे किती महत्त्वाचे असते.या कार्यक्रमात चंद्रभान वैराळकर,उदेमान शेलेकेकर, प्रल्हाद गायकवाड, विजय चोपडे, मधुकर देवरे,सैय्यद हसन,यादव सोनोने, आदि उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नारायण बोरसे यांनी केले

# उत्पादन खर्चावर आधारित भाव द्या : रविकांत तुपकर



**मलकापूर, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने आज निंबोरा येथे शेतकरी, कष्टकरी आणि मजुरांचा एल्गार मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी आपल्या भाषणातून शेतकरी प्रश्नांवर सरकारला धारेवर धरले आणि शेतकऱ्यांना संघटित होऊन लढण्याचे आवाहन केले. मेळाव्याच्या सुरुवातीला तरुणांनी गावामध्ये रविकांत तुपकर यांचे जंगी स्वागत करून गावामधून वाजत गाजत मिरवणूक काढली व नंतर मेळाव्याला सुरुवात करण्यात आली या मेळाव्याला परिसरातील शेतकरी शेतमजूर महिला व तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना रविकांत तुपकर म्हणाले आज शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे आणि याला सरकारचे धोरण जबाबदार आहे. सरकारचे धोरण म्हणजे शेतकऱ्यांचे मरण आहे, अशा शब्दांत त्यांनी सरकारवर हल्ला चढवला. सोयाबीन आणि कापसाला योग्य भाव मिळावा यासाठी पुन्हा आंदोलन करावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळालाच पाहिजे, अशी त्यांची मुख्य मागणी होती. शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीवर त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, रोज १० ते १२ शेतकरी आत्महत्या करत आहेत. कष्ट करूनही शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. सर्व वस्तूंचे भाव वाढले, पण शेतमालाचे भाव वाढले नाहीत. शेतमालाला भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची लग्ने होत नाहीत, अशी गंभीर अवस्था आहे. यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन दबावगट निर्माण करणे आणि संघटित होणे गरजेचे आहे. त्यांनी लोकांना घरात नेत्यांचे नव्हे, तर आई-वडिलांचे फोटो लावण्याचे भावनिक आवाहन केले. संघर्षाचे महत्त्व पटवून देताना तुपकर यांनी आपला अनुभव सांगितला. मलाही पीक विम्यासाठी आंदोलन केल्यामुळे सात दिवस अकोला जेलमध्ये राहावे लागले आणि त्यानंतर पीक विमा मिळाला. लढणाऱ्या व्यक्तींच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन करत त्यांनी सांगितले की, मी सामान्य घरातील मुलगा आहे, भगतसिंगांच्या विचाराने प्रभावित आहे आणि शेतकरी हितासाठी लढतो. विदर्भात ऊस उत्पादकांसारखी एकजूट नसल्याबद्दल खंत व्यक्त केली पंजाब च्या शेतकऱ्यांनी शेती विरोधी कायदे रद्द करण्यासाठी प्रदिर्घ लढा दिला तसा लढा उभारावा लागेल यासाठी तयार राहा असे तुपकर म्हणाले शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी साठी संघर्ष करण्याची तयारी दाखवली प्रसंगी शेतकऱ्यांसाठी तुरुंगात जायची वेळ आली तरी मागे हटणार नाही, आम्ही शेतकऱ्यांसाठी मरायला तयार आहोत, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी शेतमजूर कामगारांची उपस्थिती सभेला होती. सभेच्या शेवटी कर्जमाफी मिळालीच पाहिजे हक्काचा पिकविमा मिळालाच पाहिजे शेतकरी एकजुटी चा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली.

# सिंदखेड राजात तिरंगी लढत

**सिंदखेड राजा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** सिंदखेडराजा नगरपरिषद निवडणुकीतील उमेदवारी माघारीचा अंतिम दिवस संपताच लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. नगराध्यक्षासाठी तब्बल ६ उमेदवार रिंगणात असून, राष्ट्रवादी (अ.प.), शिंदेसेना आणि राष्ट्रवादी (श. प.) या तीन प्रमुख पक्षांमध्ये सरळ त्रिकोणी लढत आकार घेत आहे. बसपा आणि अपक्ष उमेदवार मैदानात राहिल्याने मतविभाजनाचा कोणाला फायदा, कोणाचे नुकसान होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. उमेदवारी माघारीचा दिवस हा निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. अनेक प्रभागांत अपक्ष उमेदवारांनी अर्ज भरताच प्रमुख पक्षांसाठी आव्हान निर्माण झाले होते. मात्र गुरुवार आणि शुक्रवार या दोन दिवसात अपक्ष उमेदवारांना एकएक करून नगराध्यक्षासाठी २ व सदस्यपदासाठी १२ अपक्षांनी माघार घेतली. त्यामुळे अनेक प्रभागांतील मुकाबला आता अधिक सरळ व स्पष्ट झाला आहे. सिंदखेड राजातील लढतही चुरशीची होणार आहे. येथे तीन पक्षात खऱ्या अर्थाने लढत होत असली तरी येथील सामना हा तसा दुरंगी ठरणारा आहे.

CHANGE OF NAME

FOR PASSPORT USE

I WASEEM KHAN RAHEEM KHAN Age 37 Years, Resi.Khadi Pura,Deulghat, Tq. Dist. Buldana, 443001 do hereby solemnly affirm and declare as under That my name Waseem Khan Raheem Khan and Wadeem Khan Raheem Khan are same person.

# गल्ली ते दिल्ली पर्यंत एकच सत्ता असली तरी शहराच्या विकासात अडचण नाही : आ.कायंदे



**देऊळगाव राजा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** देऊळगांव राजा नगरपालिकेच्या शहरातून घेतलेल्या नगराध्यक्ष यांच्या नावांविषयी मतदारांमध्ये काय भावना आहे. त्या १२ उमेदवारांपैकी कोण क्रमांक एकला आहे, याबाबत आम्ही महायतीच्या वतीने सर्वेक्षण केलेला आहे. या १२ नावांव्यतिरिक्त एखादी प्रभावी व्यक्ती योग्य उमेदवार ठरू शकते काय, हेही शोधन्यात आले त्या मध्ये योग्य उमेदवाराची निवड करून आम्ही नगराध्यक्ष पदासाठी सक्षम उमेदवार दिला आहे. स्थानिक समर्थ विद्यालयाच्या सभागृहात महायुतीच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेत सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार मनोज कायंदे यांनी सांगितले की, प्रत्येक प्रभागात विकासाच्या दृष्टीने काम करणारे उमेदवार आम्ही दिले आहेत. तीन प्रभागात आम्ही मैत्रीपूर्ण लढत लढणार आहे. आज दिल्लीत महायुती ची सत्ता आणि महाराष्ट्र राज्यात महायुतीची सत्ता असल्याने शहराच्या विकासासाठी सतत प्रयत्न करणार असे आश्वासन घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सिंदखेड राजा मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे यांनी दिले. येणाऱ्या काळात शहरातील रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था, शहर स्वच्छ सुंदर बनवण्यासाठी कटीबद्ध आहे. याप्रसंगी भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष गणेश मांटे यांनीही शहरातील अतिक्रमण मुक्त व शहराला सुविधा देण्यासाठी आश्वासन दिले. यावेळी आमदार मनोज कायंदे, डॉ.गणेश मांटे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार माधुरी शिंपने, धनशिराम शिंपने, सुनिल शेजुळकर, सुरेश तिड़के, भगवान मुंडे सह महायुतीचे उमेदवार पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सुंदरखेड येथे श्री. ज्ञानेश्वर माऊलींचा समाधी सोहळा उत्सहात



**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** शहरातील सुंदरखेड परिसरातील राजमाता नगर येथील श्री संत गजानन महाराज मंदिर संस्थान च्या वतीने श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या ७२९ व्या संजीवन समाधी सोहळ्याचे आयोजन व ज्ञानेश्वरी पारायण आणि महाप्रसाद वितरण नुकतेच करण्यात आले. यावेळी मंदिर संस्थांच्या वतीने विष्णू टिकार यांनी सकाळी अभिषेक कलश पूजन केले. त्यानंतर श्री संत गजानन महाराज मंदीर संस्थानच्या सभागृहात श्री ज्ञानेश्वर माऊलीच्या ७२९ व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने दि. १५ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर रोजी प्रा.डॉ. अनंतराव सिरसाट सर यांच्या अमृतवाणीतुन रात्री ७.०० ते ८.१० दरम्यान श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी या महान ग्रंथातील ९७ व ९८ ओवीचे पारायन स्वरूपात उपस्थित भक्तांसमोर निरूपन अर्पण केले. तसेच सायंकाळी ५.३० ते ६.३० हरीपाठाचे आयोजन करण्यात आले. १७ नोव्हेंबर ला सकाळी १०.३० मे ११.३० वाजेदरम्यान डॉ.अनंतराव सिरसाट सरांनी त्याच्या वाणीतून ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन सोहळ्याने सुंदर प्रवचन उपस्थित भक्तांसमोर वीणा, मृदुंगाच्या गजरात अभंग व भारुडाच्या मदतीने सादर केले. वाद्यवृंदांची गायकांची साथ किर्तनकार गव्हाळे माऊली गुरुजी, गोविंदराव बेडांळे, खर्चे माऊली, केंदळे टेलर, गणेदाराव इंगळे, भिका महाराज तायडे यांनी दिली. महाप्रसादाला वाटपा अगोदर श्री ज्ञानेश्वर माऊलीची ज्ञानेश्वरी, भगिनिंनी आपल्या डोक्यावर घेऊन टाळ मृदुंगाच्या गजरात मंदीराभोवती पालखी काढण्यात आली. 'ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानराज माऊली तुकाराम' असा गजर करीत दिंडी पार पडली. त्यानंतर आरती घेण्यात आली. या समारोपीय कार्यक्रमानंतर महाप्रसाद्चे वाटप उपस्थितांना करण्यात आले. या समारोपीय व अगोदरच्या कार्यक्रमासाठी चिखली येथून प्रमुख पाहुणे डॉ.यादव, प्रतापसिंग राजपूत, टेकाळे, भानूसेठ भवर प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच नगरातील निवासी बंधु-भागिनी व मंदीर समितीचे पदाधिकाराजकीय व संस्थांचे अध्यक्ष हिंमतराव खारोडे उपस्थित होते. महाप्रसादाच्या तयारीसाठी बहुमोल मदत सोनचाफा अपार्टमेंट मधील निवासी बंधू-भगिनी व नगरातील नागरिकांनी केली.

# बुलढाणा परिसरात योगा, मॉर्निंग वॉकसाठी नागरिकांची गर्दी



**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यात गेली आठ दिवसापासून थंडीची चांगलीच चाहुल लागली आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण नागरिकांची योगा, मॉर्निंग वॉकसाठी भल्या पहाटेपासून रस्त्यावर चांगलीच वर्दळ वाढलेली सध्या दिसत आहे. त्यात सर्वाधिक जेष्ठ नागरिक व पोलीस, सैन्यदलात भरती होणाऱ्या तरुणांची संख्या जास्त पाहिला मिळत आहे. बुलढाणा शहरालगत असलेल्या अजिंठा रोड, सागवन रोड, गायरान परिसर, जिजामाता कॉलेज, चिखली रोड, खामगाव रोड, जांभरूण रोड, क्रीडा संकुल परिसर, राजूर घाटाकडे सकाळी फिरायला जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. या भागात बुलढाणा शहरातील नागरिक मोठया संख्येने मॉर्निंग वॉक साठी जातात.

तालुक्यात परतीच्या पावसाने चांगलेच थैमान घातले होते. त्यामुळे नदी, नाले खळखळून तर जलस्रोत, विहरी बोर ओसंडून वाहिले आहेत. सर्वत्र पाणिच पाणि झाल्याने गारठा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यात कडाक्याच्या थंडीची चाहुल लागली आहे. आरोग्य अबादीत रहावे या साठी भल्या पहाटेपासून वयोवृध्द मंडळी गटा-गटाने योगा, मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडत आहेत. फौज, पोलीस भर्तीसाठी रस्त्यावर धावाधाव करणाऱ्या तरुणांचे गर्दी पहायला मिळत आहे. वय वृद्धांना सकाळी फिरण्याचा व कोवळे उन खाण्याचा सल्ला डॉक्टर देत आहेत. त्यामुळे वयवृद्ध मंडळी हुडहुडीमुळे उबदार कपडे घालून फिरत आहेत. तरुण मुले, मुली मात्र कडाक्याच्या थंडीत सुसाट वेगाने धावताना पाहिला मिळत आहेत. काही दिवसांनी चांगलाच गारठा वाढण्याची शक्यता आहे.

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAHMAR/2012/46689

## थोडक्यात

### दुचाकीच्या डिक्कीतून १० हजार रुपये लंपास

**मोताळा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** शहरात दुचाकीच्या डिक्कीतून चोरट्यांनी १० हजार रुपये लंपास केल्याची घटना २१ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडली.

वरुड येथील रमेश विश्वनाथ आमले यांनी स्टेट बँकेतून बारा हजार रुपये काढले, त्यातील दोन हजार खिशात ठेवले आणि उर्वरित दहा हजार रुपये रुमालात गुंडाळून दुचाकीच्या डिक्कीत ठेवले. ते जवळच्या दुकानाजवळ गेले असता, चोरट्यांनी दुचाकीची डिक्की उघडून पैसे लंपास केले. ही बाब लक्षात येताच आमले दुचाकीजवळ परत आले. पण चोरट्यांनी दुचाकीच्या डिक्कीतील रक्कम काढून पोबारा केला. यावेळी आमले यांनी किराणा दुकानातील सीसीटीव्ही तपासले असता चौघे दुचाकीच्या डिक्कीतून पैसे काढताना दिसले. याप्रकरणी पोलिसात फिर्याद दाखल नाही. आमले यांनी शनिवारी बोराखेडी पोलिस ठाण्यात फिर्याद देणार असल्याचे सांगितले.

### महिलेस धमकी; गुन्हा दाखल

**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** एका २५ वर्षीय विवाहितेला तिच्याच नंदोईने मोबाइलवर अश्लील व्हिडिओ पाहत असताना शिवीगाळ करणे, अवमानकारक बोलणे तसेच चाकूने जीव घेण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बुलडाणा शहर पोलिसांनी गुरुवारी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता त्या घरी एकट्या असताना त्यांचा नंदोई घरी आला. नातेसंबंध असल्याने त्यांनी त्याचे आदरातिथ्य केले. चहा घेतल्यानंतर आरोपी मोबाइलवर अश्लील व्हिडिओ पाहत बसला. त्याचदरम्यान त्याने तक्रारदार महिलेला अवमानकारक प्रश्न विचारले. त्यांनी त्याला विरोध केल्यावर आरोपीने शिवीगाळ केली. महिलेने नवऱ्याला फोन करणार असल्याचे सांगताच आरोपीने महिला आणि तिच्या नवऱ्यालाही चाकूने मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे.

# औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषिक सनदीची आवश्यकता नाही : जिल्हाधिकारी

## शासन परिपत्रक जारी; उद्योग घटकांना दिलासा

**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** महाराष्ट्र जमीन महसूल संहितामध्ये सुधारणा करून अकृषिक परवानगीच्या सनदेच्या आवश्यकतेची तरतूद रद्द करण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत आहे. यासाठी काही कालावधी लागणार असून ही कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत एखाद्या उद्योग घटकाला औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास अकृषिक वापराकरीता सनद घेण्याची आवश्यकता राहणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. याबाबत महसूल विभागाने शासन परिपत्रक जारी केला आहे.

या शासन परिपत्रकानुसार ज्या उद्योग घटकाला औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा आहे त्यांनी सक्षम नियोजन प्रधिकरणाकडून विकास परवानगी घेतल्यानंतर किंवा नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम आराखडे मंजूर केल्यानंतर त्यांची एक प्रत संबंधित ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेण्यासाठी सादर करावी. अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी अधिकार अभिलेखात नोंद घेऊन अधिकार अभिलेख अद्यावत करण्याची कार्यवाही यथाशीघ्र पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

केंद्र सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागद्वारे सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांपैकी व्यवसाय सुलभता हा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. व्यवसाय सुलभता (ईज ऑफ डुइंग बिझनेस) या उपक्रमाचा उद्देश भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये अनुकूल व्यवसाय परिसंस्था निर्माण करणे हा असून यासाठी विविध सुधारणात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. या सुधारणा व्यवसाय सुधारणा कृती आराखड्या भाग म्हणून राबवल्या जातात. व्यवसाय सुधारणा कृती आराखडा-२०२४ च्या अनुषंगाने महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहितातील कलमान्वये जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता परवानगीची आवश्यकता नसल्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. परंतु, या तरतुदींनुसार जमीनधारकांना मानीव अकृषिक वापराची सनद घेणे आवश्यक असून त्यासाठी करावी लागणारी कार्यवाही व वेळ हा जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता लागणाऱ्या परवानगी एवढाच लागत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करुन अकृषिक वापराच्या सनदेची तरतूद रद्द करण्याचे शासनस्तरावर प्रस्तावित आहे.

यास्तव, महाराष्ट्र जमीन महसूल संहितामध्ये सुधारणा करुन शासनस्तरावरील अकृषिक वापराच्या सनदेची तरतूद रद्द करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत व व्यवसाय सुधारणा कृती आराखडा-२०२४ च्या अनुषंगाने, एखाद्या उद्योग घटकाला औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास अकृषिक सनदेची आवश्यकता नसल्याबाबत दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार राज्य शासनाच्या महसूल विभागाने हे शासन परिपत्रक जारी केल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

# खामगावात नगराध्यक्ष पदाच्या २ तर नगरसेवक पदाच्या २३ उमेदवारांची माघार

**खामगां, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** नगरपरिषद निवडणूक २०२५ चे पार्श्वभूमीवर काल आणि आज अशा दोन दिवसात नगराध्यक्ष पदासाठी दाखल करण्यात आलेल्या २ तर नगरसेवक या पदासाठी दाखल करण्यात आलेल्या २३ अशा एकूण २५ उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे.

नगराध्यक्ष पदासाठी असलेल्या अनिता यशवंत देशपांडे अपक्ष व मनीषा अमोल बिचारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार या दोन उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे खामगाव नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी आता ६ उमेदवार उरले आहेत.



या दरम्यान नगरसेवक या पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांपैकी काल आणि आज रुपेश जुगलकिशोर कलंत्री, शाह बबलू शाह जहीर,शाह सहेर बानो जहीर, मनीषा अमोल बिचारे, प्रमिला विजय वानखडे, आकाश संतोष पाटील, विकास पांडुरंग जवंजाळ ,मनीषा अमोल बिचारे, अमोल गजानन जांभे, गणेश रामचंद्र परदेशी, गीतांजली रमेश भट्टड, गोविंद राधाकिशन शर्मा, रमेश रमणलाल भट्ट, खान नाझीम खान इकबाल, खा साजिदा बानो अन्सार खा ,कुरेशी मेहरून निसा मोहम्मद अनीस, मोहम्मद सुलतान मोहम्मद आरिफ, कुरेशी मोहम्मद अनिस शेख युसुफ, प्रवीण सुदाम जोगदंड, अनुजा करण बिडकर ,कृष्णा रामदास मुक्ते, वंदना किशोर वानखेडे ,रेखा रवींद्र जोशी यासह शिवसेनेच्या ४, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या २ तर अपक्ष १७ अशा २३ नगरसेवक उमेदवारांनी आपला अर्ज मागे घेतला आहे. नगराध्यक्ष पदामध्ये एक अर्ज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र गट पवार गट आणि एक अपक्ष असा आहे. ज्या प्रभागात उमेदवारांबाबत अपील असेल त्या प्रभागात २५ नोव्हेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहे.आता नगरपरिषदेच्या आखाड्यात नगराध्यक्ष पदासाठी ६ तर नगरसेवक पदासाठी १४३ अर्ज उरले आहेत.

# नगराध्यक्षासाठी ३; नगरसेवक पदासाठी ७७ उमेदवार रिंगणात

## अनेक अपक्ष उमेदवार वर अर्ज वापस घेण्यासाठी दबावतंत्राचे वापर



**देऊळगांव राजा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आणि इच्छुक उमेदवारांनी अर्ज भरण्यास सुरुवात केली १० नोव्हेंबर पासून काही इच्छुक उमेदवार आणि विविध पक्षाकडे तिकिटाची मागणी केली होती आज भरण्याचे शेवटच्या दिवशी उमेदवार जाहीर झाल्याने अनेक इच्छुक उमेदवारांच्या अशा पल्लवीत झाल्या त्यामुळे अनेक अपक्ष उमेदवारांनी अपक्ष निवडणूक लढवण्याची ठाम निर्णय घेतले होते परंतु अर्ज मागे घेण्याचे शेवटच्या दिवशी राजकीय दबाव तंत्र चा वापर करून अपक्ष उमेदवारांना अर्ज घेण्यासाठी मजबूर करण्यात आले तर काही अपक्ष उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज कायम ठेवून निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आज अर्ज मागे घेण्याचे शेवटच्या दिवशी अगर अध्यक्ष पदासाठी ९ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले तर सदस्य पदासाठी ४३ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आता नगर निवडणुकीत नगराध्यक्षासाठी ३; तर नगरसेवक पदासाठी ७७ उमेदवार रिंगणात उतरले आहे दोन तारखेला मतदान होईल तर तीन तारखेला निवडणुकीचा अंतिम निकाल समोर येईल महायुती, नगर विकास आघाडी, व महाविकास आघाडी कोण मारणार बाजी यावर शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# समाजकल्याण कार्यालयात तृतीयपंथीय स्मृतीदिन उत्साहात साजरा

**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** समाज कल्याण कार्यालयामार्फत आज बुलढाणा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलींचे शासकीय वसतीगृहात तृतीयपंथीय स्मृतीदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी समान हक्क, संवेदनशील व सन्मानावर भर देण्यात आला.

२० नोव्हेंबर २००५ रोजी तृतीयपंथीय समुदायाला भेडसावणाऱ्या अन्याय, भेदभाव आणि हिंसाचाराच्या विरोधात नोंद झालेल्या घटनांच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. त्या अनुषंगाने जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचा अधिकृत कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे बाल कल्याण समिती सदस्य अधिवक्ता अनुराधा वावगे यांनी तृतीयपंथीयांसाठी उपलब्ध कायदे, दस्तऐवजांमध्ये होणारे बदल, शिक्षण, आरोग्य, आर्थिक मदत आणि इतर कल्याणकारी योजनांची माहिती तपशीलवार दिली. मॉडेल डिग्री कॉलेज प्राचार्य व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. डांगे यांनी १८ वर्षाखालील तृतीयपंथीय बालकांचाही बाल या श्रेणीत समावेश असल्याचे सांगून अशा बालकांसाठी उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तृतीयपंथीयांच्या विकासासाठी जिल्हा प्रशासन कायम पाठिशी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकल्याण निरीक्षक गीता केदार यांनी केले. त्यांनी तृतीयपंथीय हक्क अधिनियम २०१९ मधील प्रमुख कायदेशीर तरतुदी, हक्क संरक्षण, शासनाच्या जबाबदाऱ्या आणि तृतीयपंथीयांना मिळणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली. समाजातील भेदभाव, अपमानास्पद वर्तन, तसेच तृतीयपंथीयांना येणाऱ्या दैनंदिन अडचणींचा विशेष उल्लेख करून समाजमान्यता आणि समान संधी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याचे त्या म्हणाल्या. कार्यक्रमात तृतीयपंथीय प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त केले. तृतीयपंथीय तक्रार निवारण समितीचे सदस्य सनावर कुरेशी यांनी शासनाने दिलेल्या संधीबद्दल आभार मानले. अमरसिंग राठोड (आम्रपाली) यांनी समाजाकडून मिळणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीचे अनुभव सांगत, आजचा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होत असल्याने मिळालेल्या सन्मानाबद्दल समाधान व्यक्त केले. मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृहातील विद्यार्थी रोशन गवई यांनी सर्व नागरिकांना समान हक्क व अधिकार आहेत, तृतीयपंथीयही त्याला अपवाद नाहीत, मानवता हाच खरा धर्म असल्याचे सांगत संवेदनशीलतेचे आवाहन केले. कार्यक्रमामध्ये पोस्टर डिझाईनिंग स्पर्धा घेण्यांत आली. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. पुजा शिंगने, व्दितीय क्रमांक स्नेहल तायडे व तृतीय क्रमांक शितल अनिल माने या यशस्वी उमेदवारांना बक्षिसे वितरित करण्यात आले.

# टीएमसी यार्डातील शेडमधून सोयाबीन कट्ट्यांची चोरी

**खामगाव, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्थानिक कृषी उत्पादन बाजार समितीतील टीएमसी यार्डातील शेडमधून दि. १७ नोव्हेंबर रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी चार सोयाबीनचे प्रत्येकी ५० किलोचे कट्टे, किंमत अंदाजे दहा हजार रुपये लंपास केल्याची घटना उघडकीस आली.

याप्रकरणी विजय यशवंत पवार (रा. बाळापूर फैल) यांनी दि. २० नोव्हेंबर रोजी शहर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली.

तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपासादरम्यान पोलिसांनी रितीक रमेश इंगळे (२५, रा. कोठारी फैल) व साकेत मनोज बिचारे (२५, रा. वामन नगर) या दोघांना दि. २० नोव्हेंबर रोजी अटक करण्यात आली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# वाहनभाडे वादातून एकाला मारहाण




**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** वाहनाच्या भाड्याच्या वादातून तिघांनी मिळून एका व्यक्तीला मारहाण केल्याची घटना शहरात घडली. याप्रकरणी जखमी मोहम्मद इकबाल अब्दुल रज्जाक (४२, रा. फिरदोस कॉलनी, अकोला, ह.मु. बुलढाणा) यांनी २० नोव्हेंबर रोजी शहर पोलिसांत तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.फिर्यादीतील माहितीनुसार, १५ नोव्हेंबर रोजी मोहम्मद यांच्या ओळखीतील शफाक बागवान व चालक मसंदे यांच्या माध्यमातून कुंदन रावसाहेब झिने यांच्या मामाचे वाहन प्रतिदिन १८०० रुपये भाड्याने घेण्याचे ठरले होते. मात्र दुसऱ्याच दिवशी वाहन खराब झाल्याने ते त्यांच्या घरासमोर उभे ठेवण्यात आले.१८ नोव्हेंबर रोजी कुंदन झिने दोन अनोळखी व्यक्तींना घेऊन मोहम्मद यांना भेटला. 'गाडी भाड्याबाबत बोलायचे आहे' असे सांगत त्यांनी तक्रारदाराला मोटारसायकलवर कारंजा चौकातून जिल्हा कारागृहाच्या पाठीमागील दर्या परिसरात नेले. तेथे तिघांनी मिळून वाहनभाडे प्रकरणावरून वाद घालून मारहाण केली. यामध्ये कुंदन झिनेनेच मुख्य मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.याप्रकरणी शहर पोलिसांनी मारहाण, जबरदस्ती व धमकीचे गुन्हे दाखल केले असून पुढील तपास सुरू आहे.

## विदर्भातील सर्वच जिल्ह्यांचा उत्स्फूर्त सहभाग

# विदर्भस्तरीय 'अदिती अर्बन' खो-खो चषकाचे उद्घाटन




**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** विदर्भ खोखो असोसिएशनचे माजी सचिव स्व. रामदास धरणे, सदानंद काणे, जे. बी. भगत आणि पप्पू खान यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ४४ वी ज्युनिअर विदर्भस्तरीय 'अदिती अर्बन' खो-खो चषकाचा उद्घाटन सोहळा शहरातील जिजामाता प्रेक्षागार संकुलात २१ नोव्हेंबरच्या सायंकाळी पार पडला. क्रीडा, सहकारसह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात शेकडो क्रीडाप्रेमी नागरिकांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम ध्वजरोहण करण्यात आले. यानंतर, क्रीडाविभूतींच्या प्रतिमेस पूजन करत दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. अध्यक्षस्थान डॉ. सुभाष गावंडे यांनी भूषविले. अदिती अर्बनचे संस्थापक अध्यक्ष तथा दैनिक महाभूमिचे मुख्य संपादक हे उद्घाटक म्हणून लाभले. स्वागताध्यक्ष अदिती अर्बनचे उपाध्यक्ष तथा सेवानिवृत्त गट शिक्षणाधिकारी दिनकरराव चिंचोले यांनी मंचावरील मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी, सामाजिक कार्यकर्ते पवन भालेराव, अशोक जयस्वाल, विदर्भ खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष सुधीर निंबाळकर, उपाध्यक्ष अशोक मोरे, कोषाध्यक्ष डॉ. गजेंद्र रघुवंशी, सहसचिव एस ए वाहाब, वाशिम जिल्हा सचिव गोविंद राऊत, नागपूरचे सचिव चंद्रकांत असोले, भंडारा पुरुषोत्तम शेलोकार, रणजीत दरणे, अरुण भगत, पियुष काणे, पप्पू खान

बुलढाणा जिल्हा खो- खो असो. समितीचे टी. ए. सोर, प्रा. कैलाश पवार, मनोज व्यवहारे, कैलाश करवंदे, संजय सावंत नीलेश पवार, सागर उबाळे यांसह अनेकांची उपस्थिती होती. विदर्भातील विविध जिल्ह्यातील संघांच्या पथसंचलनाने सर्वांचे लक्ष्य वेधले होते. दरम्यान, सहकार विद्या मंदीरच्या बँड पथकाने देखील उत्कृष्ट सादरीकरण केले. सूत्रसंचालन गजानन धांडे यांनी केले. आभार डॉ. कैलास पवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कविता पवार, चेतन गवळी, गणेश राजपूत, युवराज लांडगे, सुरज खडके सर्व सदस्य तसेच ऍफिनेटी स्पोर्टिंग क्लबचे सदस्य, शिवसाई युनिव्हर्सल स्कूलच्या खेळाडूंनी परिश्रम घेतले. गायत्री मोरे हिने प्रांगणात रेखाटलेल्या रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधले.

### 'अदिती अर्बन' खेळाडूंच्या पाठीशी: सुरेश देवकर

बुलढाण्याच्या मातीत अनेक खेळाडू घडत आहेत. खो- खो हा खेळही मातीचा आहे. खो- खो विविध खेळ प्रकारात बुलढाणा जिल्ह्याचे खेळाडू लौकिक वाढवत आहेत. अदिती अर्बन सर्व खेळाडूंच्या पाठीशी असून, बुलढाण्यातील क्रीडा संस्कृतीला वैभवशाली परंपरा लाभल्याचे प्रतिपादन सुरेश देवकर यांनी केले.

# १० वी, १२ वी नंतर काय?

## करिअरच्या वळणावरची गोंधळलेली पावले : विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी खरं उत्तर कुठे शोधावं?

**आज अनेक घरांमध्ये समान दृश्य दिसतेदहावीबारावीची परीक्षा जवळ आली की विद्यार्थ्यांइतकाच गोंधळ आणि तणाव त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावरही उमटतो. करिअर निवडीचा प्रश्न आला की चर्चा एकाच गोष्टीवर स्थिरावते: गएए देणार की NEET? जणू या दोनच वाटा आहेत आणि त्याच मार्गांनीच भविष्य उज्वल होऊ शकते. समाजाचा दबाव, नातेवाईकांचे सल्ले, मित्रांचा प्रभाव आणि सगळे करतायत, मग आपणही करायला हवं ही मानसशास्त्रीय ओढयामुळे अनेक विद्यार्थी स्वतःला न ओळखताच त्या मार्गावर निघून जातात.**





प्रत्येक विद्यार्थ्याची बुद्धिमत्ता, आवड, क्षमता आणि स्वभाव हे वेगळे असतात. त्यामुळे करिअरचा निर्णय हा एका चौकटीत बसवून देता येण्यासारखा नसतो. उलट, चुकलेली दिशा भविष्यातील वर्षानुवर्षांची मेहनत आणि मानसिक अस्वस्थता वाढवू शकते. म्हणूनच करिअर निवड ही एक विचारपूर्व प्रक्रिया असायला हवी; स्पर्धेचा मागोवा घेण्यापेक्षा स्वतःची ओळख पटवण्याचे पाऊल आधी उचलायला हवे.

### सायकोमेट्रिक करिअर चाचण्या: स्वतःला ओळखण्याचे वैज्ञानिक साधन

- करिअर निवडताना कोणते क्षेत्र चांगले? हा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे, तितकाच मी कोणत्या क्षेत्रासाठी योग्य आहे? हा प्रश्नही विचारण्याची गरज आहे. अनेक पालक आणि विद्यार्थी माहितीअभावी हा भाग दुर्लक्षित करतात. सायकोमेट्रिक करिअर चाचण्या विद्यार्थ्याच्या आवडी, बुद्धिमत्ता, क्षमता, व्यक्तिमत्व, विचारशैली यांचे वैज्ञानिक पद्धतीने मूल्यमापन करतात.

### ☐ या चाचण्यांतून साधारणपणे खालील गोष्टींचा अभ्यास केला जातो:

- कोणत्या कामात किंवा विषयांमध्ये विद्यार्थ्याला नैसर्गिक रुची आहे?
- त्याची तर्कशक्ती, गणिती क्षमता, भाषिक कौशल्य, अवकाशीय (spatial) क्षमता किती मजबूत आहे?
- विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्वशांत, क्रिएटिव्ह, विश्लेषक, नेतृत्वगुण असलेला किंवा टीममध्ये काम करणारा प्रकारकशात मोडते?
- त्याची काम करण्याची शैली कशी आहे?

**या चाचण्यांचे परिणाम विद्यार्थ्याचा संपूर्ण मनोवैज्ञानिक प्रोफाइल निर्माण करतात आणि त्यावर आधारित करिअरचे अनेक वास्तववादी पर्याय समोर येतात. हे पर्याय अंदाजावर किंवा प्रचलित ट्रेंडवर नव्हे, तर विद्यार्थ्याच्या अंतर्गत क्षमतेवर आधारलेले असतात.**



## करिअर निवडताना कोणते घटक लक्षात घ्यावेत?

१. कल (Interest) ही सर्वात स्थिर गोष्ट

ज्यात आनंद मिळतो, ज्या कामात दिवसाभर कंटाळा येत नाहीतेच करिअर दीर्घकाळ टिकते.

२. क्षमता (Aptitude) ही यशाची मुळाधार

एखाद्या क्षेत्रासाठी गणित महत्त्वाचे असू शकते, तर काही क्षेत्रांसाठी कल्पनाशक्ती किंवा संवादकौशल्य आवश्यक असते. क्षमता ओळखणे अनिवार्य आहे.

३. व्यक्तिमत्व (Personality) कामाच्या प्रकाराशी जुळले पाहिजे

उदा. अत्यंत सामाजिक व्यक्ती ऑफिसच्या एकाकी भूमिकेत टिकणार नाही; विश्लेषणात्मक विद्यार्थी कला शाखांमध्ये अडचणीत येऊ शकतो.

४. भविष्याच्या संधी आणि उद्योगाचा वेग

आजचे ट्रेंड आणि भविष्यातील बदल दोन्ही समजून घेतले पाहिजेत.

५. पालकांची भूमिका

दडपण देण्याऐवजी मुलांची नैसर्गिक क्षमता ओळखून त्यांना योग्य निर्णय घेण्यास मदत करणे आवश्यक.

६. निर्णय माहितीवर आधारित असावा

अंदाज, तुलना आणि ऐकीव गोष्टींपेक्षा तथ्यांवर आधारित मार्ग सर्वोत्तम.

करिअर निवड ही परीक्षा संपल्यानंतर अचानक करायची गोष्ट नसून एक सखोल निरीक्षणाची प्रक्रिया आहे. विद्यार्थी आणि पालक या गोंधळाच्या काळात ट्रेंडचा मागोवा घेण्यापेक्षा स्वतःचे विश्लेषण, भविष्यातील संधींचा अभ्यास आणि वैज्ञानिक मूल्यांकन यांच्या आधारे निर्णय घेतले, तर चुकीच्या दिशेने जाण्याची शक्यता कमी होते. प्रत्येक मुलामध्ये स्वतंत्र शक्ती, आवड आणि व्यक्तिमत्व असते. त्याचा आदर करून घेतलेला निर्णय विद्यार्थ्याला केवळ यशस्वी नाही, तर समाधानकारक जीवनही देऊ शकतो. भविष्याच्या दाराशी उभ्या असलेल्या तरुणांनी आणि त्यांना साथ देणाऱ्या पालकांनी करिअर निवडीचे हे बदलते स्वरूप समजून घेणे आजची गरज आहे.



अरविंद पवार, बुलढाणा. ९९६०६९०६९० (फुलब्राईट स्कॉलर, सर्टीफाईड करिअर कोच )

## बदलत्या जगासोबत चालणे आवश्यक

## भविष्यातील रोजगार क्षेत्रे:

फक्त आजची परिस्थिती पाहून करिअर निवडणे पुरेसे नाही; २०३० नंतरच्या जगात कोणत्या कौशल्यांची मागणी असेल, हेही लक्षात घ्यावे लागते. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि समाज यामध्ये मोठे बदल घडत आहेत. काही क्षेत्रे स्थिर राहतील, तर काही नवीन संधी निर्माण करतील.

**१. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स**

AI, मशीन लर्निंग, रोबोटिक्सया क्षेत्रात तज्ज्ञांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. उद्योग, शेती, आरोग्य, शिक्षण, वित्तसर्व क्षेत्रांमध्ये डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया वाढत आहे.

**२. आरोग्यसेवा क्षेत्र (फक्त MBBS नाही)**

आरोग्यसेवा हा सर्वात वेगाने विस्तारत जाणारा उद्योग आहे. परंतु डॉक्टर होणे हा त्यातील एकच मार्ग.

क्लिनिकल रिसर्च, बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल कोडिंग, फिजिओथेरपी, न्यूट्रिशन, पॅरामेडिकल क्षेत्रयांची मागणी आगामी दशकात अधिक वाढेल.

**३. पर्यावरण, ग्रीन एनर्जी व सस्टेनेबिलिटी**

जागतिक तापमानवाढीमुळे सस्टेनेबल तंत्रज्ञान, कार्बन मॅनेजमेंट, अक्षय ऊर्जा (सोलर, वायू ऊर्जा), पर्यावरणीय धोरणनिर्मिती यामध्ये मोठ्या प्रमाणात तज्ज्ञांची गरज भासणार आहे.

**४. डिझाइन आणि क्रिएटिव्ह उद्योग**

UI/UX डिझाइन, ॲनिमेशन, VFX, ग्राफिक्स, इंडस्ट्रियल डिझाइनडिजिटल जगाच्या प्रसारामुळे यांचे महत्त्व दुपटीने वाढत आहे.

**५. लॉजिस्टिक्स आणि सप्लाय चेन**

ई-कॉमर्स क्षेत्राचा सातत्याने वाढलेला वेग बघता सप्लाय चेन व्यवस्थापनातील नोकऱ्या दीर्घकाळ स्थिर राहणार आहेत.

**६. सायबर सिक्युरिटी आणि डिजिटल फॉरेन्सिक्स**

केंद्र आणि राज्य सरकारांसह खाजगी उद्योगांमध्ये सायबर सुरक्षा तज्ज्ञांची मागणी भरभराटीला आहे. भविष्यात हे क्षेत्र अत्यावश्यक होणार आहे.

**७. ॲग्रिकल्चर टेक व फूड टेक**

डिजिटल शेती, फूड प्रोसेसिंग, ऑर्गेनिक प्रॉडक्ट्स, ॲग्रो-बिझनेस ही आधुनिक रूपातील शेती विद्यार्थ्यांना नव्या संधी देत आहे.

गुड इव्हिनिंग City

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# स्टायलिश वेस्ट बॅग



**सध्या तरुणींमध्ये वेस्ट बॅगची प्रचंड क्रेझ आहे. कंबरेला लावण्यासाठी तयार केलेल्या या बॅगेला सध्या भरपूर मागणी आहे. हँड बॅग, स्लिंग बॅग, क्लच यांना पर्याय म्हणून वेस्ट बॅगचा स्टायलिंगमध्ये समावेश केला जात आहे. वेस्ट बॅग्सना बेल्ट बॅग, फॅनी बॅग, हिप बॅग, वेस्ट पाऊच या नावानेही ओळखलं जातं. त्याचे प्रकार आणि आकाराविषयी जाणून घेऊ या...**

## स्टायलिंग करताना...

- स्टायलिंग आणि अधिक वापराच्या दृष्टीनं वेस्ट बॅग अधिक फायदेशीर ठरते.
- वेस्ट बॅगमध्ये बेल्टचा पर्याय असल्यामुळे या बॅगेला शोल्डर बॅग आणि चेस्ट बॅग म्हणून देखील वापरता येऊ शकतं.
- वेस्ट बॅग्सचा महत्त्वाचा फायदा म्हणजे ही बॅग वजनानं हलकी असते. यात सामान ठेवल्यानंतर दोन्ही हात रिकामे राहतात.
- मोठ्या आकाराच्या बॅगची आवड नसणाऱ्या व्यक्तींसाठी मिनी वेस्ट बॅगचा पर्याय आहे.
- बॅग्सना स्टीकर्स आणि आकर्षक पॅच लावून त्यांचा लूक अधिक खुलवू शकता.

- प्रिंटेड वेस्ट बॅग्स : फॅशनप्रेमींना प्रिंटेड वस्तू विशेष आकर्षित करत असतात. त्यामुळे प्रिंटेड वेस्ट बॅग कमालीचं लक्ष वेधून घेत आहेत. वेस्ट बॅग हा प्रकार फॅशनेबल आणि आरामदायीही मानला जातो. तुमच्या आउटफिटवर साजेशी प्रिंटेड बॅग घेतल्यानं तुम्ही आणखी उठावदार दिसाल. वेस्ट बॅगमध्ये फ्लोरल, कार्टून, अंकारा प्रिंट, पोलका डॉट प्रिंट या प्रकारच्या प्रिंट पाहायला मिळतात. विशेषतः आपल्याकडे पॅचवर्क केलेल्या वेस्ट बॅग्सना जास्त पसंती मिळत आहे.
- मेटॅलिक वेस्ट बॅग्स : मेटॅलिक पॅटर्न सध्या ट्रेंडमध्ये आहे. हट के लूक आजमावून पाहायचा असेल तर मेटॅलिक वेस्ट बॅगचा उत्तम पर्याय आहे. काळ्या, लाल, पांढरा, गडद निळा आणि ठरावीक सौम्य रंगाच्या कपड्यांवर मेटॅलिक वेस्ट बॅग्स अधिक शोभून दिसतात. ठरावीक पॅटर्नच्या वेस्ट बॅग्स मिडी, लाँग ड्रेस, स्कर्ट यांवरही घेऊ शकतो. मेटॅलिकमधील रेन्बो, एक्लिप्स, भूमितीय आकाराच्या वेस्ट बॅग्स, सिक्वीन, मिनी सूटकेस वेस्ट बॅग या पॅटर्नच्या वेस्ट बॅग्सना मागणी आहे.

## फॅब्रिक वेस्ट बॅग्स

कापडाच्या बॅग्सना विशेष मागणी असते. वेस्ट बॅग्स हा प्रकार पाश्चात्य वाटत असेल तर फॅब्रिक वेस्ट बॅग तुमचं मत नक्कीच बदलतील. कापडी बॅग्सची आवड असणाऱ्या तरुणींसाठी बाजारात अनेक डिझाइनच्या आणि आकर्षक नक्षीकाम केलेल्या वेस्ट बॅग्स उपलब्ध आहेत. या बॅग्सचं वैशिष्ट्य म्हणजे वेस्टर्न आउटफिटसोबत जातात. विशेषतः इंडो वेस्टर्न पेहरावाची आवड असणाऱ्यांसाठी फॅब्रिक बॅग्स उत्तम पर्याय आहे. कॅनव्हास, डेनिम, बोहो स्टाइल वेस्ट बॅग्स, स्कूबा फॅब्रिक, नायलॉन बॅग्स, लोकरीच्या धाग्यांनी तयार केलेली बॅग आदी कापडांमध्ये वेस्ट बॅग्स उपलब्ध असतात.

## नानाविध आकारांचा पर्याय



वेस्ट बॅगमध्ये असंख्य पॅटर्नसोबतच भन्नाट आकारांचेही पर्याय आहेत. त्यामुळे फॅशनप्रेमी आवडीनुसार बॅग खरेदी करू शकता. आकर्षक रंग आणि आकारांच्या वेस्ट बॅग्स तुमच्या लूकमध्ये आणखी भर घालतील. वेस्ट बॅगचा लूक आणखी वाढवण्यासाठी रंगबेरंगी पट्टे बाजारात मिळतात. कंबरेचा आकार आणि पेहराव यांना मिळतीजुळती वेस्ट बॅग तुमचं सौंदर्य आणखी खुलवेल. वेस्ट बॅग्समध्ये गोलाकार, लंबगोल, बदाम, आयताकृती, चौकोनी, बॅरल बॅग, कार्टूनच्या आकारांचे, टोपीच्या आकाराची वेस्ट बॅग हे आकार ट्रेंडमध्ये आहेत.

# सुपर फॅशनेबल ब्लाऊज

**सध्या सणवारांचे दिवस आहे. नुकताच गणेशोत्सव संपला आहे. आता पितृपक्ष सुरू आहे. लवकरच नवरात्रोत्सवाला सुरुवात होईल. नंतर दसरा, दिवाळीही येईल. घराघरात सध्या नवरात्रीनिमित्त साफसफाई, सामानांची यादी, डेकोरेशन, रांगोळ्या, नवीन कपडे, साड्या, दागिने या सगळ्याची लगबग दिसून येते. सध्याचा नवीन ट्रेण्ड आहे तो म्हणजे रेडीमेड आणि सुपर फॅशनेबल ब्लाऊजचा!**



साडीमधला ब्लाउज पीस काढून त्याचे छानसे ब्लाऊज शिवून घेणे ही पद्धत रुढ आहेच, पण त्याबरोबरच अनेकींना साडीला कॉन्ट्रास्ट आणि हटके दिसेल अशा रेडीमेड ब्लाऊजची सुद्धा भुरळ पडते. ब्लाऊजची शिलाई आणि रेडीमेड ब्लाऊजच्या किमतीत फारसा फरक नसतोच, त्यामुळे कधी कधी इमर्जन्सी असते किंवा कधी कधी साडीतलेच ब्लाऊज शिवायचा कंटाळाही येतो तेव्हा हे रेडीमेड ब्लाउजचे पर्याय परफेक्ट आहेत. साडीचा लूक खऱ्याअर्थाने खुलून दिसतो तो ब्लाऊजमुळे... म्हणूनच हल्ली बाजारात सुद्धा अनेक अप्रतिम आणि वेगवेगळ्या डिझाइनचे ब्लाऊज आले आहेत. बोट नेक, डीप नेक, ऑफ-शोल्डर, जॅकेट स्टाईल ब्लाऊज, स्लीव्हलेस ब्लाऊज, कॉलर नेक, खणाचा ब्लाऊज, एम्ब्रॉयडरी ब्लाऊज असे वेगवेगळे प्रकार सध्या ट्रेण्डमध्ये आहेत.

- बोट नेक ब्लाऊज : हा प्रकार हल्ली-हल्लीच ट्रेण्डमध्ये आला आहे. नावाप्रमाणे याचा पुढचा गळा बोटासारखा अर्ध गोलाकार असतो. छोट्या बॉर्डरच्या साड्यांना हा प्रकार फार छान दिसतो. असा ब्लाउज घेतला किंवा शिवला तर तो मेगा स्लीव्हज असलेला घेऊ नका, जरासे मोठे हात या प्रकारच्या ब्लाऊजला छान दिसतात. मागे तुम्हाला हवे तसे पॅटर्न, नॉट सुद्धा लावून मिळू शकते. काठपदर सोडून साध्या साड्यांना किंवा पार्टीवेअर साड्यांनासुद्धा हा प्रकार चांगला दिसतो. ब्रोकेड किंवा एम्ब्रॉयडरी किंवा पूर्ण जरीच्या कापडात असेल तर हे ब्लाऊज जास्त उठून दिसतात.
- स्लीव्हलेस ब्लाऊज : वर्किंग वूमेनचा हा आवडता प्रकार आहे. हल्ली स्लीव्हलेस ब्लाऊज कुठल्याही पद्धतीत आणि प्रकारात मिळतात, त्यामुळे अगदी पैठणी किंवा बनारसी साड्यांपासून ते कॉटन साड्यांपर्यंत कुठल्याही साडीवर स्लीव्हलेस ब्लाऊज घालता येऊ शकतो. पैठणी किंवा भरजरी साड्यांवर जरा डिसेंट डिझाईनचा ब्लाऊज चांगला दिसतो. तसंच प्लेन किंवा साध्या साड्यांवर थोडा भरजरी ब्लाऊज छान दिसेल. हल्ली सिक्विन साड्यांचा प्रकार फार प्रचलित आहे, त्यामध्ये स्लीव्हलेस ब्लाऊज अतिशय सुंदर दिसेल.
- बलून हाताचे ब्लाऊज : आधी म्हटलं तसं सध्या तरुणांना जुन्या आणि नवीन परंपरांची सांगड घालायला नेहमी आवडते. त्यातलाच एक प्रकार म्हणजे बलून हाताचे ब्लाऊज. पूर्वीच्या सिनेमांमध्ये ही स्टाईल फार प्रचलित होती, आता पुन्हा मुलींना ही स्टाईल हवीहवीशी वाटू लागली आहे. शिवून किंवा रेडीमेड कशाही प्रकारात असे ब्लाऊज मिळतील. पार्टीवेअर आणि डिझायनर साड्यांवर अशा पद्धतीचे ब्लाऊज जास्त उठून दिसतात. सण, उत्सव, पार्टीसारख्या समारंभांसाठी हा प्रकार अगदी परफेक्ट आहे. नेट सारख्या कापडांमध्ये सुद्धा आता असे ब्लाऊज मिळतात तेही छान दिसतात.
- पेपलम ब्लाऊज : हा सगळ्यात नवीन प्रकार आहे. खरंतर, हा तुमच्या लेहेंग्यावरचा ब्लाऊज किंवा टॉपच असतो पण तोही तुम्ही एखाद्या डिसेंट साडीवर अगदी स्टायलिश पद्धतीने घालू शकता. हा ट्रेण्ड सेलेब्रिटीजमुळे जास्त लोकप्रिय झाला आहे. असं स्टायलिंग केल्यावर इंडो-वेस्टर्न फ्युजन पद्धतीत तुमचा पेहराव दिसतो. नेहमीच पद्धतीची साडी नेसून कंटाळा आला असेल तर हा प्रकार अतिशय युनिक आहे.
- कॉलर ब्लाउज : थोडा इंडो-वेस्टर्न स्टायलिंगमध्ये हा एक प्रकार सुद्धा ट्रेण्डिंग आहे. कुर्त्याला जशी स्टॅण्डिंग कॉलर असते, तशाच पद्धतीचा पॅटर्न या ब्लाऊजमध्ये असतो. या मध्ये तुम्ही स्लीव्हलेस किंवा थोडे मोठ्या हाताचे असे आपल्या आवडीप्रमाणे स्टाईल

## साडीचं वॉर्डरोब बनेल क्लासी...

सिल्क, कॉटन, जरी आणि जरा फॅन्सी नेट सारख्या ४-५ प्रकारातील ब्लाऊज घेतले तर तुम्ही तुमचं पूर्ण साडीचं वॉर्डरोब अगदी क्लासी बनवू शकता. पांढरा, काळा, लाल, मस्टर्ड, गोल्डन, छान गारेगार हिरवा या ४-५ रंगांचे ब्लाऊज तुमच्याकडे असतील तर तुम्ही वाटेल ते कॉम्बिनेशन आणि फॅशन करू शकता. गोल्डन, लाल, हिरवा अशा पद्धतीच्या रंगामध्ये कुठल्याही काठपदराच्या किंवा सिल्कच्या साड्या उठून दिसतात. अजरख प्रकार सुद्धा फार प्रचलित झालाय, त्यांचं फॅब्रिक आणि प्रिंट फारच ट्रेण्डी आणि मिनिमलिस्टिक वाटतात, त्या साड्यांवर तुम्ही कॉटन प्रिंटेड जे ब्लाउज असतात ते डोळे झाकून वापरू शकता, त्यात अर्थातच मिक्स-मॅच कॉम्बिनेशन केलेत तर उठून दिसेल.




निवडू शकता. शक्यतो फॉर्मल किंवा अगदी प्लेन साध्या साड्यांवर हे ब्लाऊज चांगले दिसतात. हे ब्लाऊज शक्यतो प्लेन सिंगल कलरमध्ये मिळतात, तुम्हाला हवे तसे पॅटर्न यामध्ये शिवून जास्त चांगले मिळतात.

- रफल ब्लाऊज : आजकाल हजारो प्रकारच्या वेगवेगळ्या डिझायनर साड्या मिळतात, त्याही पलिकडे जाऊन रेडीमेड साड्या सुद्धा मिळायला लागल्या आहेत. अशा साड्यांवर फ्रिलचे ब्लाऊज फार छान दिसतात. सध्याच्या ट्रेण्डी प्रकारात त्याला रफल ब्लाऊज म्हणतात. सेलेब्रिटीजमुळे हे असे प्रकार इतके नावारूपाला आलेत की आपण म्हणू त्या स्टाईलचे कपडे सध्या बाजारात यायला लागले आहेत. पार्टी कॅटेगरीच्या आऊटफिटसाठी तुम्ही हा प्रकार नक्कीच स्टाईल करून बघा, इतरांपेक्षा सगळ्यात जास्त युनिक दिसाल. हे ब्लाऊज प्रिन्सेस पॅटर्नमध्ये असतात आणि अगदी फ्रीसाईझ मध्येही बाजारात मिळतात.
- खणाचे ब्लाऊज : खणाचे कपडे मागच्या काही वर्षात इतके लोकप्रिय झाले की प्रत्येक स्टायलिंगमध्ये, सणावाराच्या शॉपिंगमध्ये, प्रत्येक समारंभात खण अगदी उठून दिसू लागला. तुम्ही जर साडी शौकीन असाल आणि अगदी छोट्या छोट्या समारंभाला सुद्धा साड्या नेसायला आवडत असतील, तर एखादा तरी खणाचा ब्लाऊज तुमच्याकडे असायलाच हवा. आजकाल मिक्स-मॅच पद्धत असल्यामुळे एखादा छानसा लाल किंवा हिरवा खणाचा ब्लाउज असेल तर तो अगदी कॉटनपासून ते हलक्या सिल्कच्या साडीपर्यंत सुद्धा घातलेला चालू शकतो. आता खणाच्या ब्लाऊजमध्ये सुद्धा इतके असंख्य प्रकार, प्रिंट आणि पॅटर्न आहेत की हे घेऊ की ते असं होतं.
- चिकनकारी ब्लाऊज : शक्यतो सफेद, ऑफ-व्हाईट, प्लेन ब्लॅक किंवा कुठलयही प्लेन सिंगल कलरमध्ये चिकनकारी ब्लाऊज अतिशय छान दिसतात. मूळ कॉटन, सॉफ्ट कॉटन, कॉटन सिल्क, लिनन अशा साड्यांवर डोळे झाकून चिकनकारी ब्लाऊज घेऊन टाका. सध्या हॅन्ड-पेंटेड आणि प्राजक्ताच्या फुलांची एम्ब्रॉयडरी असलेल्या मूळ कॉटनच्या साड्या फार लोकप्रिय झाल्यात, अशा साड्यांवर सफेद चिकनकारी ब्लाऊज फारच उठून दिसतो. ऑफिसमधल्या दिवाळी सेलिब्रेशनसाठीही कॉटन साडी आणि चिकनकारी ब्लाऊज परफेक्ट आहे.
- पैठणी ब्लाऊज : आजकाल पैठणी हा प्रकार फक्त साडीवर न राहता इतर कपड्यांमध्ये सुद्धा आला आहे आणि तो कमालीचा सुंदर दिसतो. पैठणीचे काठ, डिझाईन असलेले असंख्य ब्लाऊज बाजारात आले आहेत, तुमचं थोडंसं जास्तीचं बजेट असेल तर हा ब्लाऊज तुमचा कपाटात अगदी नक्की असायला हवा. जगातल्या कुठल्याही पद्धतीच्या जरीच्या साडीवर तुम्ही हा ब्लाऊज मॅच करू शकता. पैठणीचे क्रॉपटॉप सुद्धा हल्ली मिळतात तेही तुम्ही लेहेंगा किंवा साडीवर ब्लाऊज म्हणून वापरू शकता.

सायंदैनिक
# गुड इव्हिनिंग City
२२ नोव्हेंबर २०२५, शनिवार

## सीमाभागात बिबट्याचा वावर वाढला; सतर्कतेचा इशारा



**सिंदखेडरराजा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** विदर्भमराठवाडा सीमावर्ती पट्ट्यात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वन विभागाने तातडीचा 'अलर्ट' जारी करत सर्वांना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून विविध भागांत बिबट दिसत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. दुसरबीड–सिंदखेडराजा रोडवरील पळसखेड चक्का गावाजवळ काही दिवसांपूर्वी रात्री आठच्या सुमारास बिबट कारसमोर आल्याची घटना घडली होती. सुरुवातीला संबंधित व्हिडिओ 'फेक' असल्याची चर्चा होती; मात्र स्थानिक शेतकऱ्यांनी सीसी कॅमेऱ्यांतील फुटेज तपासल्यानंतर बिबट्याची उपस्थिती स्पष्ट झाल्याने विभाग सतर्क झाला. वन विभागाने तत्काळ शोधमोहीम राबवली, परंतु तोपर्यंत बिबट्याने पुढे सरकण्याचा मार्ग पकडला होता.दरम्यान, पुन्हा एकदा वखारीरामनगर रोडवरील बाजी उमरद परिसरात बिबट दिसल्याची नवी माहिती समोर आली. त्यामुळे या पट्ट्यात त्याचा सक्रिय वावर असल्याचे निश्चित झाले आहे. दोन्ही जिल्ह्यांच्या सीमेलगत असलेल्या कृषी पट्ट्यात रात्रीच्या वेळी शेतकरी पहारा किंवा शेतीकामासाठी जात असतात. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी विशेष सतर्कता आवश्यक असल्याचा इशारा विभागाने दिला आहे.जालना जिल्हा हद्दीतूनही 'अलर्ट' जारी करण्यात आला असून वन कर्मचारी दिवसरात्र गस्त ठेवून हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवत आहेत. स्थानिकांनी कुठेही बिबट दिसल्यास तत्काळ वन विभागाच्या हेल्पलाइनवर संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.वन विभागाने नागरिकांना रात्री एकटे बाहेर न पडणे, शेतातील जनावरांना सुरक्षित जागी बांधणे, तसेच लहान मुलांना निर्जन जागी जाऊ न देणे अशा प्राथमिक काळजी उपायांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे. सीमावर्ती भागात वन्यजीवांचा वावर वाढत असल्याने पुढील काही दिवस विभागाने विशेष पथके तैनात केली आहेत.

## तहसिलदार कुमरेंची अवैध वाळूच्या टिप्परवर कारवाई



**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** बांधकामासाठी वापरला जाणारा महत्त्वाचा घटक म्हणजे वाळू आहे. नदीतून वाळू काढल्याने भूजल पातळी कमी होते, जैवविविधतेचे नुकसान होते आणि नैसर्गिक जलचक्रात बदल होतो, ज्यामुळे पूर येण्याचा धोका वाढतो. याव्यतिरिक्त नदीकिनारी परिसरांचेही नुकसान होते तसेच मासे आणि इतर जलचरांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होतात. असे असतांना देखील वाळू माफिया नदी पात्रातून अवैध वाळू उपसा करतात. काल रात्री बुलडाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी घाटाखालून येणाऱ्या अवैध वाळूच्या टिप्परला पकडले आहे. त्यामुळे घाटाखालून बुलडाण्यात येणाऱ्या वाळू माफियांचे धाबे दणाणले आहे.

बुलडाणा जिल्ह्यातून वाहणारे २ प्रमुख नद्या आहे. त्यात घाटाखालच्या भागात पूर्णा तर घाटावरील भागात खडकपूर्णा नदी वाहते. याच २ नद्यात वाळू माफियांचा साम्राज्य पसरलेला आहे. बुलडाणा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी वाळू माफिया विरोधात कडक भूमिका घेतल्यानंतर घाटावरील भागात वाळू माफियांच्या काळ्या कृत्यास लगाम लागल्याचे दिसत असले तरी घाटा खालील वाळू माफिया बेफाम झालेले आहे. इतकंच नव्हे तर जिल्हा मुख्यालय असलेल्या बुलडाणा शहरात देखील घाटाखालून टिप्पर द्वारे वाळूची अवैध वाहतूक सुरू आहे. काल शुक्रवारी कडाक्याची थंडीत मध्य रात्री २ वाजेच्या सुमारास बुलडाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे व चालक अशोक देवकर हे गस्तीवर असतांना मलकापूर रोड वरील रिलायंस मॉल समोर त्यांनी एका मिनी टिप्पर क्र. एमएच– १९, सीएक्स–२८९५ याला थांबवून चालक गोकुळ कांडेलकर याला विचारपूस केली असता त्याने सदर टिप्पर संजय रायबोले रा. मलकापूर यांचे असून बुऱ्हानपूर (मध्यप्रदेश) घाटाची वाहतूक मुदत संपलेले रॉयल्टी दाखवली. त्यामुळे सदर टिप्पर जप्त करून बुलडाणा शहर ठाण्यात जमा करण्यात आले असून मालकावर दंडात्मक कारवाई करणार, अशी माहिती तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी आज २२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता दिली आहे. बुलडाणा शहरात अवैध वाळू वाहतूक करताना कोणी आढळला तर त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

## लिलाबाई फिरके यांचे निधन

**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलढाणा नगर परिषदच्या माजी उपनगराध्यक्ष कुंदा



विष्णू पाटील यांच्या मातोश्री लिलाबाई रघुनाथ फिरके यांचे २२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता वृध्दपकाळाने निधन झाले आहे. त्यांनी वयाच्या ८९ व्या वषी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पार्थिवावर आज २२ नोव्हेंबर रोजी संगम तलाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. ॲड.व्ही.डी. पाटील यांच्या त्या सासूबाई होत्या.

## डॉ. स.त्र्यं.कुल्ली स्मृतिदिनानिमित्त ज्ञानदान



**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक आणि मार्क्सवादी विचारवंत डॉ. सदाशिव त्र्यंबक कुल्ली यांची पुण्यतिथी दिनांक २३ नोव्हेंबर रोजी साजरी करण्यात येत आहे त्यानिमित्ताने दरवर्षी ज्ञानदानाचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. यावर्षी या कार्यक्रमांतर्गत संत साहित्याचे वर्तमा या विषयावर नांदेड येथील नामांकित वक्ते, कवी, कादंबरीकार श्री श्रीकांत देशमुख यांचे व्याख्यान होईल. बळिवंत, आषाढमाती हे काव्यसंग्रह आणि पिढीजात ही त्यांची कादंबरी जाणकारांच्या पसंतीस उतरली आहे .तसेच बोलावे ते आम्हीच या त्यांच्या कवितासंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. खामगाव येथील डॉ.दादा कवीश्वर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न होणार असून याप्रसंगी प्राचार्य डॉ. गोविंद गायकी हे प्रमुख अतिथी असतील. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. एस. एम. कानडजे यांना राज्यस्तरीय साहित्य वैभव हा पुरस्कारही प्रदान करण्यात येईल. शाहूनगरमधील प्रगती सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात सायंकाळी ६वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास साहित्य रसिकांनी उप–स्थित राहावे असे आवाहन व्रिक्ष फाउंडेशन आणि प्रगती वाचनालयाच्या अध्यक्ष सुजाता कुल्ली यांनी केले आहे.

## सहकार विद्या मंदिरच्या एन.सी.सी. कॅडेटस्ची चमकदार कामगिरी




**बुलढाणा, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** संरक्षण मंत्रालयाचा भाग असलेल्या १३ महाराष्ट्र बटालियन एन.एन.सी. खामगांव येथे १० नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर या कालावधीत एन.सी.सी. वार्षिक कंबाईन ॲनवल ट्रेनिंग कॅम्प आयोजित करण्यात आला होता.

संपूर्ण अमरावती ग्रुप मधून ४०० कॅडेट्स विविध शाळा, कॉलेजेस मधून या कॅम्प मध्ये सहभागी झाले होते. सहकार विद्या मंदिर, बुलढाणाचे ४० एन.सी.सी. कॅडेट या कॅम्प मध्ये सहभागी झाले होते. सदर कॅम्प कालावधीत कॅडेट्स यांना इंडियन आर्मीच्या सानिध्यात शस्त्र प्रशिक्षण, मॅप रिडींग, ड्रील, हेल्थ ॲन्ड हायजिन, प्रथमोपचार, खामगांव स्थित औद्योगिक वसाहतीतील विविध कारखान्यांना भेट, आपती व्यवस्थापन, फायर फायटिंग इ. विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. जवळपास सर्वच स्पर्धा प्रकार व प्रतियोगितामध्ये सहकारच्या कॅडेट्स नी विविध मेडल व ट्रॉफी प्राप्त करुन अव्वल नामांकन प्राप्त केले. सहकार विद्या मंदिरच्या कॅडेट्सला ०७ गोल्ड व १३ सिल्वर मेडल व ०३ संयुक्तीक ट्रॉफी मिळाल्या. विजेत्यांना १३ महाराष्ट्र बटालियन चे कमांडिग ऑफीसर कर्नल ओमेश शुक्ला यांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले. रिसालदार मेजर दिनेश कुमार, सुभेदार सचिन बोधे, इंन्स्टक्टर शंकर सर, शाम जामोदे यांनी कॅम्प यशस्वी होण्याकरीता अथक परीश्रम घेतले. संस्थेच्या अध्यक्षा कोमल झंवर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतूक केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, मुख्यध्यापीका व एन.सी.सी. ऑफीसर राजु हिवाळे यांना दिले.


### जाहिर सुचना

**श्री गजानन महिला अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बुलडाणा र.नं. ४३२ ता. बुलढाणा जि. बुलढाणा**

**(फक्त सभासदांसाठी)**

**प्राधिकृत अधिकारी याव्दारे जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात येते की, श्री गजानन महिला अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड बुलढाणारं.नं. ४३२ ता.जि. बुलढाणा या संस्थेची नोंदणी नंतरची प्रथम सभा दि.२९/११/२०२५ रोजी संस्थेच्या मुख्य कार्यलय मेन रोड चांडोळ ता बुलडाणा येथे सकाळी ११ वाजता या कार्यालयात खालील विषयांवर चर्चा करुन ठराव पारीत करण्यासाठी घेण्यात येत आहे.**

**विषय क्र.१) संस्थेच्या सभासदांकडून हंगामी व्यवस्थापक समितीची निवड करणे बाबत**

**विषय क्र.२) हंगामी व्यवस्थापक समिती मधून अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड करणे बाबत.**

दिनांकः २९/११/२०२५
**स्थळ : बुलढाणा**

**आर.ए.डहाके**
प्राधिकृत अधिकारी अंतर्गत
निबंधक सहकारी संस्था बुलडाणा


## 'गाव तेथे वाचनालय' योजना कागदावरच; ग्रामीण भागात ग्रंथालयांची दुरवस्था

**खामगाव, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** वाचन संस्कृती रुजवून सुजाण, वैचारिक आणि सक्षम नागरिक घडवण्याच्या उद्देशाने शासनाने राबवलेली 'गाव तेथे वाचनालय' ही महत्त्वाकांक्षी योजना प्रत्यक्षात मात्र अनेक ठिकाणी नाममात्र ठरत असून ग्रामीण भागातील बऱ्याच ग्रंथालयांची स्थिती आजही अत्यंत बिकट आहे. अनेक गावांमध्ये ग्रंथालये बंद पडली आहेत किंवा केवळ कागदोपत्री अस्तित्वात असल्याचे चित्र दिसते.राज्यात सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९६७ लागू करून १ मे १९६८ पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. त्यानंतर २ मे १९६८ रोजी ग्रंथालय संचालनालय स्थापन करण्यात आले. या अधिनियमान्वये लोकांच्या वाचन अभिरुचीची जपणूक करणे, सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे मजबूत करणे आणि गावोगावी वाचनालय उभारणे हा मुख्य उद्देश निश्चित करण्यात आला होता.मात्र प्रत्यक्षात परिस्थिती याउलट दिसत आहे. ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने ग्रंथालये पाडझड अवस्थेत आहेत. काहींच्या इमारती आहेत पण पुस्तके नाहीत; तर अनेक ठिकाणी कर्मचारी नसल्याने दारे कायम बंद असतात. वाचनालयांच्या व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे ही महत्त्वाची योजना मार्गभ्रष्ट होत आहे.ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाचे केंद्र म्हणून सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व आजही तितकेच आहे. गावखेड्यातील विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि तरुणांना विविध क्षेत्रातील अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्यासाठी ही केंद्रे अत्यावश्यक आहेत. डिजिटल युगामुळे वाचन संस्कृतीकडे काही प्रमाणात दुर्लक्ष होत असले तरी ग्रंथालयांमार्फत पुन्हा वाचन परंपरा मजबूत करू शकतो, असा तज्ज्ञांचा विश्वास आहे. ग्रामीण पातळीवर वा–चनालयांचे पुनरुज्जीवन झाल्यास तरुण पिढीत वाचनाची आवड वाढण्यास मोठी चालना मिळू शकते.

## टायपिंग सेंटरमध्ये अल्पवयीन मुली सोबत मैत्रीचा आग्रह; गुन्हा दाखल




**खामगाव, २२ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** शहरातील एका टायपिंग सेंटरमध्ये प्रशिक्षणासाठी येणाऱ्या अल्पवयीन मुलीचा मोबाइल क्रमांक मिळवून तिच्याशी जबरदस्ती मैत्री करण्याच्या प्रयत्नात एका २२ वर्षीय तरुणाला पोलिस ठाण्याची हवा खावी लागली आहे. १७ वर्षीय मुलीच्या सतर्कतेने हा प्रकार उघडकीस आला असून शहर पोलिसांनी संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, खामगावातील टायपिंग सेंटरमध्ये प्रशिक्षणासाठी येणाऱ्या तरुणाने अल्पवयीन मुलीचा मोबाइल क्रमांक मिळवून तिच्या व्हॉट्सॲपवर वारंवार संदेश पाठवण्यास सुरुवात केली. संशयास्पद संदेशांमुळे मुलीने त्याच्याशी संपर्क तोडला. मात्र, दुसऱ्याच दिवशी तरुण तिला प्रत्यक्ष भेटला आणि तिच्या जवळ बसत 'तुझ्याशी मैत्री करायची आहे' असा आग्रह धरू लागला.मुलीने त्याचा प्रस्ताव स्पष्ट नकारत धुडकावून लावला आणि त्वरित खामगाव शहर पोलिस स्टेशनमध्ये धाव घेऊन तक्रार दाखल केली. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.अल्पवयीन मुलींना त्रास देणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.